बीड । सोमवार
१०.०३.२०२५
वर्ष : ४ अंक : ३३१
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# जिल्ह्यात जलजीवन योजनेचे अडीचशे कोटी रुपये अडकले

## टक्केवारीचे दिलेले पैसे अडकल्याची चर्चा: ॲड. अजित देशमुख



**बीड । प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजना राबवून सरकार परत आणण्याचा प्रयत्न झाला. हा प्रयत्न यशस्वी देखील झाला. मात्र विकास कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली गेली आहेत. त्यामुळे या योजनेच्या नादात सरकार आणून शासनाने जनतेची फसवणूक केल्याचे स्पष्ट दिसते. बीड जिल्ह्यात केवळ जलजीवन योजनेचे जवळपास अडीचशे कोटी रुपये अडकले असून अनेक सुशिक्षित बेकार अभियंते आणि कंत्राटदार व्याज भरत-भरत परेशान आहेत. त्यामुळे ही एक प्रकारची फसवणूक असल्याचा आरोप जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केला आहे.

राज्य शासनाने लाडकी बहीण योजना निवडणुका जवळ आल्यानंतर राबवली. योजना राबवणे हा सरकारचा अधिकार आहे. मात्र योजनेच्या माध्यमातून सरकार आणून जनतेची फसवणूक करणे, हा अधिकार शासनाला नाही. या योजनेच्या नादात एका-एका महिलेने पंचवीस पंचवीस वेळेला लाभ घेतल्याचे निष्पन्न झाले असले, तरी त्यावर कारवाई होत नाही. पुढील निवडणुकीकडे सरकारचा डोळा आहे. योजना राबवण्याचा नादात निकष पाहिले नाहीत. आता दिलेले लाभही कमी होत आहेत. जिल्ह्यातील विकास कामे पूर्णपणे खुळंबली गेली आहेत. तर दुसरीकडे अनेकांनी अनेक कामात दिलेली टक्केवारी अडकून पडल्याने अनेक जण परेशान असल्याची चर्चा जनतेत आहे. सामान्य लोक यात भरडले गेले आहेत. तरी देखील पुढाऱ्यांना याचे देणे घेणे नाही. आठ आठ महिन्यापासून अनेक ठिकाणी जलजिवनची कामे अडकून पडलेली आहेत. त्यांना बिल दिले जात नसल्याच्या तक्रारी होत आहेत. सोलापूर जिल्ह्यात एका कॉन्ट्रॅक्टरने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. अशा बाबी गंभीर आहेत. जलजिवनची अनेक कामे थोड्या प्रमाणात चालू आहेत. मात्र यात गुत्तेदारांचा पैसा अडकून पडला आहे. गुत्तेदारांची कामे कशा पद्धतीने आहेत, हा मुद्दा वेगळा आहे. मात्र अशा प्रकारे त्यांची पिळवणूक करणे, हे कुठल्याही शासन नियमात बसत नाही. त्यामुळे गुत्तेदारांनी देखील शासनाच्या विरोधात पाऊल उचलायला हवे. मात्र तसे होत नाही. एकट्या जलजिवन योजनेचे असे झाले आहे, असे नाही. तर सर्वच विकास कामांना खिळ बसलेली आहे. त्यामुळे नवे सरकार आल्यापासून निधी नसल्याचा बहाणा सांगत विकास कामे खोळंबली आहेत. सामान्य जनतेची यात फसवणूक झालेली आहे. त्यामुळे जनतेने जागे होणे आवश्यक आहे, असेही ॲड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

- सरकार कडून शेतकऱ्यांची फसवणूक
- जिल्ह्यातील विकास योजना टप्प झाल्या
- कामे मंजुरीसाठी पैसे दिल्याची देखील चर्चा
- हे पैसे परत मिळवण्याच्या अडचणी वाढल्या
- सरकार आले मात्र जनतेची फसवणूक झाली

सात वर्षानंतर होणाऱ्या पंचायत समिती आमसभेसाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

## मागेल त्याला शेत तलाव मंजूर होणार : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**



दि.१५ मार्च २०२५ रोजी आष्टी पंचायत समिती आणि दि.१६ मार्च २०२५ रोजी पाटोदा आणि शिरूर (कासार) येथे आयोजित करण्यात आलेल्या आमसभेमध्ये सर्व घटकातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे

आष्टी येथे निवासस्थानी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते ते म्हणाले सन २०१७ नंतर आष्टी पाटोदा आणि शिरूर (कासार) पंचायत समिती येथे आमसभांचे आयोजन करण्यात आले आहे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत

मागेल त्या शेतकऱ्याला शेततळे मंजूर करण्यात येणार आहेत. केंद्र शासनाच्या वतीने पूर्वी ३०÷३०÷३ या आकारम ानाचे ६.५० लक्ष रू.किंमतीचे शेततळे मंजूर होत असत. परंतु त्यामध्ये बदल करण्यात आला असून यानंतर आता २५÷२५÷३ या आकाराचे ५.०० लक्ष रु. किंमतीचे शेततळे मंजूर करण्यात येणार आहेत.. मग मागणी करण्यात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला शेततळे मंजूर करण्यात येणार आहे पूर्वीच्या शेततळ्यांच्या प्रशासकीय मान्यता बदलून नवीन प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे त्याबाबतचे आदेश तीनही पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना देण्यात आले आहेत त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शेततळे करून घ्यावेत असे आवाहन करून आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सर्व योजनेतील घरकुले मंजूर करण्यात आली असून सर्व लाभार्थ्यांना पहिला हप्ता त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेला आहे मात्र आष्टी तालुक्यातील तीन आणि शिरूर (कासार) तालुक्यातील एका ग्रामपंचायत मध्ये काही लाभार्थ्यांना अडचणी निर्माण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे ..

तथापि घरकुलाच्या यादीतील सन २०१४ नंतर प्रपत्र

▶▶ उर्वरित पान २ वर

# भारताने Mini World Cup ही जिंकला !

## १३ वर्षानंतर Champions Trophy वर कोरलं नाव




**वृत्तसंस्था**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये टीम इंडियाने न्यझीलंडवर शानदार विजय मिळवला आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा अंतिम सामना टीम इंडिया आणि न्यूझीलंड या २ बलाढ्य टीममध्ये खेळला गेला. या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माने आपल्या तुफानी फलंदाजीने खळबळ उडवून दिली. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर हा सामना खेळला जातोय. जिथे न्यूझीलंडविरुद्ध २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी टीम इंडिया मैदानात उतरली आहे. कॅप्टन रोहितने शर्माने टीम ला एक चांलगी सुरुवात करुन दिली. अवघ्या ४१ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकत न्यूझीलंड विरोधात २५ वर्षे जुना बदला घेतला.२००० साली चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये न्यूझीलंडकडून हरल्याने टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफीचे स्वप्न भंगले होते. चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकण्याची टीम इंडियाची ही तिसरी वेळ आहे. याआधी २००२ साली सौरभ गांगुलीच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदा त्यानंतर २०२५ साली एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली दुसऱ्यांदा आणि आता रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. भारताने शेवटची चॅम्पियन्स ट्रॉफी २०१३ मध्ये जिंकली होती. ▶▶ उर्वरित पान २ वर

# वाढीव टप्पा निधीची अर्थसंकल्पात तरतूद करा

## बीड जिल्हा विनाअनुदानित कृती समितीचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांना निवेदन




**बीड । प्रतिनिधी**



सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात १४ ऑक्टोबरच्या निर्णयाची अंमलबजावणी करून टप्पा वाढीसाठी निधी मंजूर करा, अशी मागणी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री अर्थमंत्री आणि शिक्षणमंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली. १४ ऑक्टोंबरच्या शासन निर्णयानुसार वाढीव टप्पा अनुदानासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा संघटनेच्या वतीने गेली पाच महिन्यांपासून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. परंतु सरकारने मात्र विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या टप्पा वाढ अनुदानाची मागणी गांभीर्याने न घेता सातत्याने दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे संतप्त ▶▶ उर्वरित पान २ वर

# घरकुल योजनेत कसलाही गैरप्रकार होता कामा नये

## आ.संदीप क्षीरसागरांकडून प्रशासनाला कडक निर्देश



**बीड । प्रतिनिधी**

सध्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना यांसह शासनाच्या विविध घरकुल योजनेची कामे प्रशासकीय स्तरावर सुरु आहेत. या योजनेतील लाभार्थी हे गरजू आणि वंचित असतात. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होण्यास कसल्याही प्रकारचा अडथळा होऊ नये, तसेच या योजनांच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर आर्थिक मागणी अथवा इतर कसलाही गैरप्रकार होऊ नये याची पुरेपूर दक्षता घ्या. तसेच पात्र लाभार्थींना तातडीने घरकुल हप्ता वितरीत करा, असे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिका, बीड पंचायत समिती व शिरूर कासार पंचायत समिती व बीड नगरपालिका येथील अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सध्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत नवीन उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर सध्या प्रस्ताव दाखल करून घेणे सुरू आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरीचे ऑनलाईन अर्ज दाखल करून घेण्याची प्रक्रिया झाली आहे. रमाई आवास योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत स्तरावरून दाखल करवून घेऊन पंचायत समितीमार्फत समाजकल्याण विभागाकडे दाखल करण्यात आले आहेत तसेच त्रुटी असलेले प्रस्तावांची पुर्तता करणे सुरू आहे. बर्याचवेळा या योजनेतील लाभार्थ्यांकडून अधिकारी ▶▶ उर्वरित पान २ वर

### बोगसगिरी आणि लाभार्थ्यांची पिळवणूक अजिबात खपवून घेणार नाही

**दरम्यान, घरकूल योजनेचा लाभ घेऊन घर न बांधताच अधिकार्यांच्या संगनमताने रक्कम उचलल्याचे गैरप्रकार जिल्ह्यात समोर आले आहेत. असले प्रकार बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात अजिबात खपवून घेणार नाही. त्यासोबतच लाभार्थ्यांची अधिकार्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूकही सहन केली जाणार नाही. अशी तंबीही आ.संदीप क्षीरसागरांनी अधिकार्यांना दिली आहे.**

### बीड तालुक्याने विशेष लक्ष देण्याची गरज, दिरंगाई चालणार नाही

**घरकुलाचा पहिला हप्ता सोडविण्यात बीड तालुका मागे पडला आहे. बीड पंचायत समिती अंतर्गत एकूण २९२९ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे बीड पंचायत समितीने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबतीत दिरंगाई चालणार नाही. यासोबतच घरकूल संदर्भात बीड नगरपालिकेच्याही अनेक तक्रारी नागरिकांमधून होत आहेत. त्याची तातडीने सोडवणू प्रशासनाने करावी. असेही आ.संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.**

# ‘ती’च अस्तित्व

८ मार्च–जागतिक महिला दिन..! भारतात रोज कुठला न कुठला दिन साजरा केला जातो. अगदी त्याचप्रमाणे महिला दिन ही मोठया प्रमाणावर साजरा करतात. तो फक्त या दिवसापुरताच मर्यादित..!

एरव्ही परत दुसऱ्या दिनाची आपण वाट पाहत असतो.

हो न...? खरचं का इतके संकुचित झालोय आपण?

महिलांचं महत्व काय फक्त एका दिवसापूरते सीमित आहे का?

हे म्हणजे असे आहे– जसे शेतकरी बांधव बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करतात.

त्या दिवशी ते बैलांना सजवतात अगदी न काम करून घेता,त्याला पुरणपोळी खाऊ घालतात,त्याचे आभार मानतात आणि दुसऱ्या दिवसापासून परत त्यास कामास जुंपतात..! परत वर्षभरानंतरच त्याची पूजा व आभार.हे चक्र चालूच असते.

माझे प्रामाणिक मत आहे की एक दिवसाचा विशेष दिन साजरा करायला काहीच हरकत नाही पण एरव्ही ही त्यांचे महत्व,त्यांचे आभार व्यक्त करायला काय हरकत आहे..!

उत्सवाचा स्रोत
महिला दिन उत्सव
म्हणून न राहता,
उत्सवाचा स्रोत व्हावा..!
साजरा करायचे म्हणून
न करता,
स्त्रियांचे वर्षभर महत्व
वाटावे समाजाला...!!

महिला दिनाची पार्श्वभूमी

जागतिक– ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री–कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यांबरोबरच लिंग, वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमीनिरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री–पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही जोरकसपणे केली. अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली. १९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्कीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री–कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा ऋजागतिक महिला–दिन’ म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो पास झाला. यानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून १९१८ साली इंग्लंडमध्ये व १९१९ साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळाले.

भारतात– भारतात मुंबई येथे पहिला ८ मार्च हा महिला दिवस १९४३ साली साजरा झाला. १९७१ सालच्या ८ मार्चला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता.

पुढे १९७५ हे वर्ष युनोने ’ जागतिक महिला वर्ष’ म्हणून जाहीर केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका, कार्यालयांमधूनही ८ मार्च साजरा व्हायला लागला आहे. आजच्या काळात जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करताना दिसून येतो..

१९७५ या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले. १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीने विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतून साजरा करवा यासाठी आवाहन केले.

स्त्री चे नानाविध रूपे

सर्व साहित्यिकांचीही माफी मागून इतकेच सांगावेसे वाटते आपण स्त्री चे वेगवेगळे पैलू प्रकर्षाने कधी मांडलेच नाहीत.

(ठराविक अपवाद असतीलही पण प्रकर्षाने नाही)

स्त्री म्हटलं की आई/मातृ या रूपालाच सगळीकडे महत्व दिले गेले ते रूप महत्वाचे आहेच यात कोणाचं दुमत नसणार पण स्त्री च्या इतर रुपांचं काय??

स्त्री
ती आई आहे
ती ताई आहे
ती मैत्रीण आहे
ती पत्नी आहे
ती मुलगी आहे
ती जन्म आहे
तीच सुरवात आहे
आणि
सुरवात नसेल तर
बाकी सारे व्यर्थ आहे...!!

अशा नानाविध रुपात ती असते.

त्या सर्वांचे महत्व आहेच न ते ही आपण मान्य करायला हवे,विशद करायला हवे.

आई विषयी आपल्याला जितके महत्व वाटते ना तितकेच महत्व इतर रूपाविषयी वाटेल त्या दिवशी स्त्री खऱ्या अर्थाने सुरक्षित असेल.

विश्वातील अनेक देशांपैकी स्वतःची वेगळी अशी सांस्कृतिक ओळख असणारा आपला हा भारत देश..! ज्या देशात स्त्री ला देवी सम मानणारा येथील रहिवासी.

या देशातील अनेक क्षेत्रात स्त्रियांनी आपले महत्त्व दाखवून दिले आहे.

अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत.

तरीही तळपती समशेर बनून आजकाल ती आपल्या शत्रूंशी लढत आहे. हे शत्रू किती आहेत याची गिनती करणे सोपे आहे, पण ते कोण आहेत हे ओळखणे अवघड आहे.

जगातल्या सर्वात सुरक्षित जागेत म्हणजे आईच्या पोटात ती जन्म घेते.

आजकाल तिच्या गळ्यालाच नख लावण्याचे दुष्टकार्य केले जाते तेही ‘जन्मदात’ आईबापाच्या संमतीने आणि आजी–आजोबा, आत्या, मामा यांच्या साक्षीने. कदाचित आईच्या मनाविरूद्ध ते घडत असेल.

आपल्या मातृप्रेमाच, वात्सल्याच्याही चिंधड्या उडवल्या जाताना तिला पाहावे लागत असेल यापेक्षा तिच्या नशिबी वाईट गोष्ट काय असेल.

यांतून जरी एखादी स्त्री वाचलीच तर पुढेपण तिच्यासमोर संकटांचा पर्वतच पर्वत असतोच न.

पुरुषांनी बदलावे
वासनेपोटी वा शरीरसुखासाठी
हल्ली ती दररोज मरत आहे,
कधी अत्याचार कधी जिवंतपणी
तिला जाळलं जातं आहे..!
तिचं ही स्वतःच अस्तित्व
तसंच स्वतःच मत आहे,
पुरुषांनाच आता ना
ऐकण्याची गरज दिसत आहे...!!

स्त्रियांचे शत्रू

स्त्रियांचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे पुरूषी मानसिकता. जाहिरातीतले तिचे प्रदर्शन असो वा चित्रपट नगरी असो वा समाजात वावरताना ती भूषवत असणारी पदे असो ती नेहमीच पुरुषांना भावेल अशी रेखाटली जाते.

अगदी शिक्षण घेत असताना देखील पुरुषी मानसिकतेची सरंजाम शाही तिच्यावर वर्चस्व गाजवण्याची एकही संधी सोडत नसते.

नोकरी करत असतानाही हीच परिस्थिती कायम असते.

लग्नानंतर देखील तिच्याच नशिबात संकटे असतात.

अशा अनेक शत्रूंना रिचवत, पचवत ‘ती’ तिची लढाई लढत असते.

ती खरे तर भारतीय समाज व्यवस्थेचा मूलभूत कणा आहे.

तो कणा टिकला तरच ही समाजव्यवस्था टिकून राहील हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे.




जर तिच्यावर अन्याय करणार्या नवर्याचा हात तिने थांबवला वा मुलींशी बेताल वर्तन करणार्या आपल्या मुलाच्या श्रीमुखात भडकावली तर हे अराजक चित्र बदलण्यास वेळ लागणार नाही.

निसर्गाने तर तिला ‘प्रेम’ नावाची विलक्षण देणगी दिली आहे.

ते तिचे शस्त्रच आहे.

या शस्त्राने ती अनेक अवघड कार्य सहजरित्या पार पाडत असते.

तिच्या शब्दात मंत्राचे सामर्थ्य आहे.

या मंत्राने ती अग्नी फुलवूही शकते व विझवूही शकते.

त्या मंत्राचा ती कसा उपयोग करते, यावर समाजाचे अस्तित्व अवलंबून आहे. महिलांचे मग त्या कोणत्याही रुपात का असेनात त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे हा विचार समाजात रूजायला आणखी किती दिवस लागतील, हे सांगता येणे कठीण आहे.

पण कुठेतरी ही पुरुषी मानसिकता थांबायला हवी अन स्त्री–पुरुष समानतेचे बीजे रुजायला हवीत.

लेक वाचवा
तिच्या अस्तित्वामुळेच संपूर्ण
विश्व अखंडपणे चालत आहे,
ती आहे म्हणून तर ममतेचे
नाते नित्यपणाने बहरत आहे...!
टिकले जर स्त्रियांचे अस्तित्व
अबाधित असेल इतर सर्वांचे,
म्हणून ’लेक वाचवा’करु संकल्प
औचित्य साधत महिला दिनाचे.!!

स्त्रियांचा आदर केला गेला पाहिजे,त्यांचे अस्तित्व मान्य करायला हवे याच त्यांच्यासाठी शुभेच्छा असतील.

तमाम महिलांच्या ‘अर्ध्या आभाळा’तला श्रद्धेचा, विश्वासाचा सूर्य कधीच न मावळो हीच या जागतिक महिला दिनानिमित्त तिला शुभेच्छा!!

**– संकलक/लेखक**
**प्रा.सोमीनाथ खंडागळे, पाटोदा (बीड)**

# महात्मा गांधी आणि इस्लाम



सनातन असणारे महात्मा गांधी आणि इस्लाम हा संबंद समजून घेतला तर आमच्या लक्षात येते की महात्मा गांधीच्या जीवणीमध्ये इस्लाम च्या अनेक प्रेरणा कृतीबद्ध झालेल्या आहेत . महात्मा गांधी यांची खिलापत चळवळ यात मुस्लिमांनी त्यांना दिलेली साथ लक्षात राहणारी आहे . सत्य अहिंसा ही तत्वे आपण इस्लाम मधून आल्याचे ते सांगतात . महात्मा गांधीनी कुराण व हदिस यांचे वाचन केलेले होते . आज आम्ही देखील कुराण वाचून घेतले पाहिजे कारण आम्हाला ज्ञान नसलेल्या गोष्टी बद्दल गैरसमज होणार नाहीत . महात्मा गांधींचे एक गीत आम्हा सर्वांना माहीत आहे ,ईश्वर अल्लाह तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान अगदी याच अर्थाची पहिली आयात सुरह १ अल फातिहा मधील बिस्मिल्लाहिरहहमानीरहिम अल्हमदूलिललाहि रब्बिल आलमीन याचा अर्थ देखील सर्व कौतुक अल्लाह चे जो सर्व जगाचा रब आहे एकेश्वरवाद गांधीवादाचा मूळवाद आहे जो कुराण मधील प्रमुख अर्क आहे . म्हणजे अल्लाह एकच आहे . फाळणीच्या नंतर पाकिस्तान मधून ज्यांना भारतात यायचे त्यांना सवलत देण्याचा निर्णय महात्मा गांधीनी घेतला , यात मुस्लिमांना दार खुली केली म्हणून ज्या शक्तिना आवडले नाही त्यातून भारताचा पहिला आतंकवादी जन्मला नथुराम गोडसे . मुस्लिमांच्या प्रेमाने गांधीना आपले बलिदान द्यावे लागले हे तथ्य मान्य असलेले अनेक लोक जगात आहेत .

भारताच्या राष्ट्रपित्याने इस्लाम या धर्मातील अनेक तत्वे अंगीकारली आहेत आम्ही कोण आहोत जे इस्लाम आणि मुस्लिम बद्दल गैरसमज करून घेतोत . आम्ही देखील इस्लाम मधील आदर्श तत्वे समजून घेतली पाहिजेत . आज रोजा चा उपवास सोडताना अनामिक नदीम भाई सोबत यावर चर्चा करत आहे .

– भागवत तावरे, बीड

पान १ वरून पुढे...

## मागेल त्याला...

ॲड मधील दर्शवलेल्या सर्व लाभार्थ्यांना कोणताही राजकीय पक्ष अभिनिवेष ठेवता सर्व लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात येणार आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत एका गावामध्ये २० पेक्षा अधिक कामे मंजूर करता येत नाहीत त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना याबाबतचे अधिकार नसल्यामुळे त्यांच्या ऐवजी विभागीय आयुक्त यांचेकडून मंजुरी घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले आगामी काळामध्ये सर्व मजुरांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या त्यांना काम उपलब्ध करून देण्यात येईल. या आणि अशा सर्व मागण्यांबाबत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) या तीनही तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या नागरिक ग्रामस्थांनी या आम सभांमध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपले मत मांडावे असे आवाहनही शेवटी त्यांनी केले आहे

## भारताने Mini...

२०१७ मध्ये भारत अंतिम फेरीत पाकिस्तानविरुद्ध पराभूत झाला.

### टीम इंडियासमोर न्यूझीलंडकडून २५१ धावा

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने टीम इंडियाविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. फलंदाजीत किवी संघाची सुरुवात फारशी फारशी चांगली झाली नाही. पहिल्या विकेटसह, भारतीय गोलंदाजांनी आपली पकड घट्ट केली आणि नियमित अंतराने यश मिळवले. डॅरिल मिशेल आणि मायकेल ब्रेसवेल यांनी किवी संघासाठी निश्चितच काही वेळ क्रीजवर घालवला. दोघांनीही न्यूझीलंडकडून अर्धशतकी खेळी केली. टीम इंडियाकडून कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती यांनी गोलंदाजीत आपली हुशारी दाखवली आणि प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. याशिवाय मोहम्मद शमी आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. अशाप्रकारे टीम इंडियाने निर्धारित ५० षटकांत न्यूझीलंडला फक्त २५१ धावांवर रोखले.

पान १ वरून पुढे...

## वाढीव टप्पा...

झालेल्या सर्व राज्यातील विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनी संपूर्ण राज्यासह बीड जिल्ह्यात जेल भरो आंदोलन आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनासाठी बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिसांकडे रीतसर परवानगी मागितली परंतु पोलिसांनी बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जेलभरो आंदोलनासाठी परवानगी नाकारली. पोलिसांनी जेलभरो आंदोलनाला परवानगी नाकारल्या नंतर आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम असलेल्या विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शांततेच्या सनदशीर मार्गाने आपल्या मागण्यांच्या संदर्भातल्या शासनाला निवेदन सादर करण्याची पोलिसांनी विनंती केली. पोलिसांच्या या विनंतीला मान देऊन मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव यांच्या सह जिल्हा कार्यकारणी सदस्य विश्वनाथ मुंडे आणि महेंद्र वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांच्या दालनामध्ये जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देण्यात आले.

## घरकुल योजनेत...

आर्थिक मागणी करत असल्याच्या तक्रारी येत असतात. जे नागरिक या योजनेचे लाभार्थी आहेत ते सर्व अतिसर्वसामान्य, गरीब आणि वंचित घटकातील असतात. त्यांची अडवणूक करणे, आर्थिक मागणी करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार या योजनेच्या कार्यवाहीत होता कामा नये. तसेच जे लाभार्थी पात्र आहेत त्यांचे हप्ते तातडीने वितरीत करा अशाप्रकारचे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तालुक्याचे गटविकास अधिकारी, बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

पान ४ वरून पुढे...

## महिला कर्मचारी...

प्रॉब्लेम, केज गळती, त्वचा कोरडी पडणे, त्वचेच्या अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. तसेच बॉडीपेन, इझ, व्ह थायराईड अश्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते का? याचा मानसिक व शारिरीक आरोग्यावर खुप गंभीर परिणाम पडून कौटुंबिक, वैयक्तिक जीवनावर परिणाम पडतो. ते भविष्यात ठळण्याकरिता स्वताच्या मानिसकतेवर कामकरावे, आवडी, छेड जोपासावे, निमित वेळे व्यायम, आहार व झोप यावर महिलांनी लक्ष केंद्रीत करुन माझे मानसिक आरोग्य माझ्या हातात आहे यावर त्या बोलत होत्या.

श्रीमती सारीका पाखरे मडॅम यांनी माहिला दिना निमीत्त विविध खेळात सहभाग घेण्या बाबत मार्गदर्शन करुन पुढे येण्या बाबत महिलाना अवाहन केले.

श्रीमती शितल बडगे मडॅम यांनी जागतिक महिला दिनानिमीत्त स्त्री म्हणजे त्याग, प्रेम, कणखरापणा आणि प्रेरणा, त्यांना स्त्री आई म्हणून कळली तो जिजाऊचा शिवबा झाला, ज्यांना स्त्री बहिण म्हणुन कळली तो मुक्ताईचा ज्ञानदेव झाला, ज्याला स्त्री मैत्रीण म्हणून कळली तो राधेचा शाम झाला, ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली तो सितेचा राम झाला असे मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमास उपस्थिती राहिलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे आभार प्रदर्शन श्रीमती राणी सातपुते मडॅम यांनी मानले व सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती शिल्पा ससाणे मडॅम यांनी केले.

पान ४ वरून पुढे...

## रक्षण करताच....

आली आहे. महिला दिना दिवशी असा दुर्देवी प्रकार घडल्याने कायद्याच्या रक्षण कर्त्याला कठोर ती कठोर कारवाई करून त्याला भर चौकात नग्न करून चाबकाचे फटके मारण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या महिला विभागाच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी केली आहे.

## सुरेश धस...

हरण मारून स्कार्पियो गाडीतून घेऊन गेला आहे, मी माझ्या डोळ्याने बघितत आहे, असंही महेश म्हणाले. दिलीप ढाकणे यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. मोर्चात सहभागी झालेल्या सगळ्यांचा मी आभारी आहे, आम्हाला एवढं मारलं याचा आम्हाला कमी दुःख आहे. मला सगळ्यात जास्त दुःख आहे हरिण वन्य प्राणी मारल्याचं. मी त्यांना आडवा गेलो म्हणून मला एवढं मारलं. मानवावर एवढा हल्ला करतात तर मुक्या प्राण्यावर कसा हल्ला करत असतील याचा विचार करा. आमची एकच मागणी आहे या सर्व आरोपींना कडक शासन झालं पाहिजे, असं दिलीप ढाकणे म्हणाले.

मोर्चेकऱ्यांच्या मागण्या

सतीश भोसले उर्फ खोक्या आणि त्याचे सहकारी हरणाची तस्करी करणे, त्यातून भरपूर पैसे कमवणे हा मुख्य व्यवसाय करतात. त्यासाठी त्याला वनविभागाचा राजकीय वरदहस्त असून या सर्व प्रकरणाची चौकशी करावी. तसेच वन्यजीव कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा.

पान ४ वरून पुढे...

ढाकणे कुटुंबीयाला मारहाण झाल्यानंतर शिरूर पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक धोकरट यांनी ढाकणे कुटुंबाची तक्रार घेतली नाही.

यामुळे ढाकणे कुटुंबाला पोलीस अधीक्षकांकडे जावे लागले. परंतु त्या ठिकाणीही तक्रार घेतली नाही, याबाबतची चौकशी करावी.

या सर्व घटनाक्रमामध्ये ओबीसी समाजाच्या गरीब कुटुंबावर पोलीस प्रशासनाकडून अन्याय कोणाच्या दबावाखाली झाला. याबाबतची चौकशी करावी. आमदार सुरेश धस आरोपींस वाचवण्यासाठी उघड सहकार्य करत असल्याचे दिसून येत असताना त्यांना सहआरोपी करावे.

यासह सतीश भोसले यांचे आणखी कुठले अवैधधंदे आहेत. या सर्वांचा शोध घ्यावा.

## बीडमध्ये शेल....

प्रवासावर प्रतिबिंबित केले. बदल घडवून आणण्यासाठी त्यांचा उत्साह आणि वचनबद्धता स्पष्ट होती आणि त्यांच्या अभिप्रायाने शाळांमध्ये नेक्सप्लोररचा सकारात्मक परिणाम अधोरेखित केला. अनेकांनी त्यांच्या कौशल्यांमध्ये सुधारणा करण्याची आणि प्रकल्प–आधारित शिक्षणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अधिक स्पष्टता मिळविण्याच्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी आणि शाश्वततेची संस्कृती वाढवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे, ज्यामुळे शिक्षकांना प्रभावी बदल घडवून आणण्यासाठी सक्षम केले जाते. या

पान ४ वरून पुढे...

रीफ्रेशरद्वारे मिळालेल्या गतीमुळे, शिक्षक आता विद्यार्थ्यांना त्यांचे नेक्सप्लोरर प्रकल्प पुढील स्तरावर नेण्यास मदत करण्यासाठी अधिक सुसज्ज होतील.

शेल नेक्सप्लोरर आणि अटल उपक्रम व निती आयोग यांच्यातील सहकार्य नवोपक्रम–चालित शिक्षणाला बळकटी देत आहे, ज्यामुळे तरुण मनांना भविष्यातील समस्या सोडवणारे आणि बदल घडवणारे बनण्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळणार आहे.

## धारूर शहर...

गायसमुद्रे यांची निवड करण्यात इतर कार्यकारणी एकमताने निवडण्यात आली उपाध्यक्ष संजय शिरसाट, बंटी गायसमुद्रे, करणं सिरसट, सचिव चंद्रकांत सिरसट सहसचिव अक्षय वैरागे, सल्लागार आकाश गायसमुद्रे, बादल सिरसट , आदीची निवड करण्यात आली. या बैठकीला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते

## सारिका डोंगरे...

शालेय शिक्षणातून जीवनात उपयोगी पडतील अशा कला विकसित करण्यासाठी उपक्रमांचे वर्षभर आयोजन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांना जीवनामध्ये नवीन कला शिकण्याचा आनंद मिळतो. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल कुटुंब, मित्र–मैत्रिणी, नातेवाईक व परिसरातून श्रीमती सारिका डोंगरे यांचे अभिनंदन होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# धारूर ग्रामीण रुग्णालयात किडनी आजाराचे विशेष रोग निदान शिबिर; संपन्न रुग्णाचा प्रतीसाद

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**



सार्वजनिक आरोग्य विभाग , जिल्हाशल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय बीड आणि एच एल एल लाईफ केअर लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामिण रुग्णालय धारूर येथे किडनी आजाराने ग्रस्त अत्यवस्थ ५४ रुग्णांची तपासणी करण्यात आली.या शिबीराचा शुभारंभ माजी नगराध्यक्ष डॉ स्वरुप सिंह हजारी यांचे हस्ते करण्यात आला.

जिल्ह्यातील प्रसिद्ध किडनी विकार तज्ञ डॉ अजित घोडके यांनी किडनी या शिबिराकरिता परिसरातील व केज, वडवणी, अंबाजोगाई , परळी तालुक्यातील ए के डी घऊ, सी के डी उघऊ तसेच मधुमेह व उच्च रक्त दाबामुळे होणारे किडनीच्या आजाराने ग्रस्त रुग्णांची तपासणी करून उपचार व मार्गदर्शन केले.

या शिबिरा करीता धारूर नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा वरिष्ट डॉ. स्वरूपसिंह हजारी हे उद्धाटक म्हणून उपस्थित होते , तर शहरातील वरिष्ट पत्रकार अनिल महाजन, पत्रकार सचिन थोरात , डॉ सचिन राऊत, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रस्तावित वैद्यकीय अधीक्षक डॉ अनिल परदेशी यांनी केले तर पत्रकार सय्यद रहीम आणि पत्रकार अतिक मोमीन यांची विशेष उपस्थिती होती.

या प्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन करून जिल्ह्यातील पहिली ग्रामीण रुग्णालय स्तरावर उपलब्ध झालेली डायलिसिस सेवे बाबत समाधान व्यक्त करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. एच एच ल लाईफ केअर चे क्लस्टर हेड सागर देशमुख ,डॉ शिंदे, डॉ परवेज शेख , डॉ अंरविद नित्के , सुफियान ,आकाश , गणेश आणि अफरोज सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतले

# वंचित संघटित कामगारांच्या प्रश्नावर शेख अमर यांचे कार्य कौतुकास्पद : राजेंद्र मस्के

**● बांधकाम कामगारांना गृह उपयोगी वस्तू व सुरक्षा संच वाटप**

**बीड । प्रतिनिधी**

शनिवार दिनांक ८ मार्च रोजी व्हीआयपी हॉल तेलगाव नाका बीड येथे महिला दिनाच्या औचित्य साधून महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने व महाराष्ट्र इमारत बांधकाम व इतर कामगार कल्याण मंडळ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने नोंदणीकृत कामगारांना गृह उपयोगी साहित्य व सुरक्षांच्या साहित्याचे वाटप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, बीड शहर प्रमुख शेख निजाम भाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजेंद्र मस्के असे म्हणाले की गेल्या अनेक वर्षांपासून बीड शहरांमध्ये बांधकाम मुजरांना संघटित करण्याचे काम माजी नगरसेवक शेख अमर यांनी केले आहे, त्यांचे काम गरजू व वंचित कामगारांसाठी उल्लेखनीय आहे ते सातत्याने कामगाराच्या प्रश्नावर आवाज उठवण्याचे काम करत असतात मजूर कामगारांसाठी शासनाने विविध योजना पुरवल्या पाहिजेत यासाठी त्यांचा लढा सुरू असतो, त्यांच्या संघटनेच्या माध्यमातून हजारो कामगारांना एकजूट करण्याचे काम केले आहे, त्यांना देखील कामगारांनी साथ देण्याचे काम करावे असे मत राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले, आहे यावेळी हजारो कामगारांना सुरक्षा संच व बृहपयोगी साहित्य वाटप करण्यात आले, यावेळी रतन गुजर,शफिक काजी, शेख आजामभाई, बद्रीनाथ जटाळ, जयवंत वाघ, महेश सावंत,सह कामगारांची उपस्थिती उल्लेखनीय होती.





*डॉ.भीमराव पिंगळे विद्यालय, बीड या शाळेत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम शाळेच्या शिक्षिका श्रीम.सोनवणे मॅडम यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले.कार्यक्रमाला अचानक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलेले वैजिनाथ आण्णा गव्हाणे ,मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. मुख्याध्यापक, रोहिदास डोंगरदिवे यांनी अध्यक्षीय समारोप करताना स्त्रियांचे समाजातील स्थान किती महत्त्वाचे आहे.याविषयी मार्गदर्शन केले.*




*अल्पाईन मल्टिस्पेशलिटी हॉस्पिटल औरंगाबाद येथे महिला दिवस साजरा करण्यात आला .हॉस्पिटलचे मालक डॉ संतोष शेळके व डॉ अर्चना राजपूत त्याच बरोबर हॉस्पिटल मधील डॉक्टर्स डॉ. असलम शेख, डॉ कोमल राऊत, डॉ राखी जैन डॉ. ईश्वर नागाणे व हॉस्पिटल मधील स्टाफ विनोद पाटील, हेमंत जाधव, मनोज जावळे, पियूष डोंगरदिवे या सर्व मान्यवराची कार्यक्रमला उपस्थिती होती. कार्यक्रमात सर्व हॉस्पिटल मधील नर्सिंग स्टाफ कडुन केक कटिंग करण्यात आला असुन या वेळी नर्सिंग स्टाफ मध्ये प्रियंका, भाग्यश्री, दिक्षा, सोनाली, वैष्णवी, प्राजक्ता, जयश्री, दीपाली, उज्वला या सर्वांची उपस्थिती होती*

# आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे जागतिक महीला दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

दि.०८ मार्च २०२५ रोजी आधार व्यसनमुक्ती केंद्रामधे जागतिक महीला दिन वेगळ्या उपक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केंद्र संचालक तेजसनाना घुमरे, डॉ. रमाताई गिरी, संतोषजी गर्जे व बाजीराव ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.



या अनोख्या कार्यक्रमात जिल्हा रूग्णालय बीड येथील विवीध विभागाच्या प्रमुख रणरागिणींचा सत्कार करण्यात आला. यामधे डॉ.रमाताई गिरी (नर्सिंग सुपरीटेंडेंट) शकुंतला सुतार (लेबर होम इनचार्ज) शारदा डहाळे ( नर्सेस हॉस्टेल इनचार्ज) द्वारका खाडे (सोनोग्राफी सेंटर इनचार्ज) शिला कुलकर्णी (खउण इनचार्ज) विद्या गायसमुद्रे (डायलिसीस इनचार्ज) रेखा गोतावळे (मेल सर्जिकल इनचार्ज) पुजा ठोंबरे (केंद्र परीचारीका) गौरी घुमरे यांच्या अतुलनिय कार्याबद्धल जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी तेजसनाना यांनी सत्कारमुर्ती रणरागिणी, केंद्रातील सर्व कर्मचारी व रूग्णांना मार्गदर्शन केले. यावेळी सत्कारमुर्ती रणरागीणी या सेवाभावी वृत्तीने रूग्णासोबत कसलाही भेदभाव न करता सेवा देतात तसेच रूग्णांना शारिरीक व मानसिक दोन्ही दृष्टीने सशक्त बनवतात म्हणुन तुमच्या सेवेपुढे आजच्या जागतिक महिला दिनी नतमस्तक होतो असे म्हणाले. यावेळी सत्कारमुर्तींनीही मार्गदर्शन केले. यात प्रामुख्याने डॉ.रमाताई गिरी या बोलताना म्हणाल्या की व्यसन ही समाजाला लागलेली किड आहे. व्यसनाधिन माणसामुळे कुटुंब उध्वस्त होते यामुळेच व्यसनापासुन दुर राहा. या कार्यक्रमास तेजसनाना घुमरे, संतोषजी गर्जे, बाजीराव ढाकणे उपस्थित होते

# अट्टल महाविद्यालयात लिंकडिंग प्रोफाइल व मुलाखत तंत्र यावर कार्यशाळा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच व्यक्तिमत्व व करिअरच्या संधी उपलब्धतेसाठी सातत्यपूर्ण प्रयत्नशील असते. महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात लिंकडीन प्रोफाइल बनवणे व मुलाखत तंत्र या विषयावर दि. ७ मार्च २०२५ रोजी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी पहिल्या सत्रात साधन व्यक्ती म्हणून डॉ. अमोल शिरसाट हे उपस्थित होते. बहुराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी उपलब्ध आहेत.



# शांताई अर्बन मध्ये जागतिक महिला दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

जिथे स्त्री चा सन्मान होतो, तिथेच समाजाची प्रगती होते..! स्त्री शक्तीला मान, समानतेला स्थान.. तिथे देव ही रमतो देवाचा आशीर्वाद लागतो आणि हा आशीर्वाद शांताई अर्बनलां आहे असे मत डॉ अविनाश देशपांडे सर यांनी मांडले धावपळीच्या युगात स्त्रिया या स्वतः च अस्तित्व बाजूला ठेवून कुटूबासाठी झटत असतात.




या स्त्रियांचा दिवस म्हणजे ८मार्च. फक्त ८मार्च पुरता स्त्री चा सन्मान न करता दररोज स्त्री चां सन्मान झाला पाहिजे असे मत संस्थेचे अध्यक्ष डॉ डी बी शिंदे सर यांनी मांडले.

आपल्या जवळच्या प्रत्येक स्त्रियांची विविध रुपं आहेत त्यात आईचं स्थान सर्वात श्रेष्ठ. आपण तिच्यापोटी जन्म घेतलेला असतो. पराकोटीची करुणा व क्षमाशीलता तिच्यात असते. त्यामुळं हे सगळ्याच स्त्रिया स्वाभाविकपणे करुणा आणि क्षमाशिलता हे गुण स्त्रियांच्या ठायी हमखास असतात. त्यांच्या गुणांमुळे हे जग साहिष्णुतावादी बनवण्यात खूप मोलाचा वाटा आहे ! असे मत वाघमारे सर नी मांडले. सर्व उपस्थित महिलांनी आपले मत, विचार, अनुभव मांडले.खडतर परिश्रम करून कशी यशाची उंची गाठली हे सांगितले. अंजली गवई, अनिता माने, आशा भोसले, पल्लवी देशपांडे, संध्या कुलकर्णी, वर्षा देशमुख, केंडेताई, अंबिलवादे मॅडम, मनीषा गायकवाड, आरती कुलकर्णी मीरा शिंदे, गिरी मॅडम, प्रियांका कागदे शुभांगी शिंदे, प्रिया शिंदे, प्रतिभा कोकर्ण, संस्थेच्या वतीने सर्व महिलांना चा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कर्मचारी खातेदार पिगमी एजंट उपस्थित होते.

# अनिषा शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाने आष्टीकरांची मने जिंकली

## महाभारत, शेतकरी व्यथा, शिव तांडव, सोशल मिडियाचे सादरीकरण ठरले लक्षवेधी

**आष्टी । प्रतिनिधी**

महाभारतातील श्रीकृष्ण जन्म, द्रौपदीचे वस्त्रहरण,युद्धभूमीवरील सादरीकरण तसेच सद्यस्थितीत शेतकऱ्यांच्या समस्या,सोशल मिडीयाचा होणारा अती वापर आणि त्यातून विद्यार्थ्यांची बदलत चाललेली मानसिकता यासह विविध नृत्य, संगीत, नाटक आणि इतर कला प्रकार सादर करत आष्टी शहरातील अनिषा ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आष्टीकरांची मने जिंकली.

शहरातील पिंपळेश्वर देवस्थान संचलित अनिशा ग्लोबल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी सायंकाळी ६ ते १० या वेळेत संपन्न झाले. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्धाटन उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव,संचालक ह.भ.प.रामदास डोरले महाराज,सुखलाल मुथा,प्रा. लक्ष्मण रेडेकर,संजय मुळे, सौ. प्राजक्ता धस यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.



यावेळी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दुरावत चाललेली माणसे त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकत जाणारी तरुणाई यावर प्रकाश टाकत सामाजिक संदेश देत कुटुंबातील वाढत असलेला विसंवाद याला सोशल मीडिया कशा पद्धतीने कारणीभूत आहे,हे विद्यार्थ्यांनी त्यांच्या नाटीकेतून सादर केले. तर सद्यस्थितीत शेतमालाला मिळणारा बाजार भाव,अवकाळी,गारपीट यासह अन्य कारणांनी पिकांचे होणारे नुकसान त्यामुळे कर्जबाजारी होत चाललेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा सादरीकरणाने उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आले.

शिव तांडव नृत्याने,तर चिमुकल्यांच्या नव नवीन कला आणि संस्कृतींचा परिचय करून देत त्यांच्यातील कलात्मक क्षमतांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.या कार्यक्रमासाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

जागतिक महिला दिनानिमीत्त....

# महिला कर्मचारी यांचा गुणगौरव सोहळा सामाजिक वनीकरण विभाग बीड तर्फे साजरा

**बीड । प्रतिनिधी**

विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण बीड या विभागाच्या वतीने ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमीत्त सर्व महिला कर्मचारी यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे उदघाटक अध्यक्ष म्हणून विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण बीड श्री. श्रीनिवास लखमावाड साहेब, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षीका पुरस्कार प्राप्त जि. प. शाळा, पालवन सौ. गंगासागर गव्हाणे/आहेर मर्डेम ह्या होत्या तर प्रमुख उपस्थिती वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. बी.एम. वाघाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. यु.आर. चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. एच.एन. जाधवर, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. जी.बी. शेवाळे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. एस.पी. आरशेवार हे उपस्थिती राहिले. सदर कार्यक्रमाच्या आयोजक वनपरिक्षेत्र अधिकारी, सामाजिक वनीकरण बीड श्रीमती आर.एस. बांगर मडॅम, यांनी महिला दिनानिमीत्त आयोजित कार्यक्रमाचे प्रस्तावित करुन महिला जागतिक दिना निमीत्त मार्गदर्शन केले.



श्रीमती गव्हाणे / आहेर मडॅम यांनी २१ व्या आधुनिक युगात महिलानी विविध कार्यक्षेत्रात, कामात उत्तुंग भरारी घेवून भविष्यातील नव भारत निर्मातीसाठी महत्वाचे योगदान दिले पाहिले असे जागतिक महिला दिननिमीत्त अवाहन केले.

तसेच विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण बीड श्री. श्रीनिवास लखमावाड यांनी जागतिक महिला दिना निमीत्त महिला कर्मचारी यांचा गुणगौरव करुन माहिलांनी सामाजिक क्षेत्रात अधिक समक्ष होऊन पुढे आले पाहिजे. तसेच वृत्तस्तरीय विभागीय वन क्रिडा स्पर्धा २०२५ परभणी येथे आयोजित केलेल्या विविध क्रिडा प्रकारात विशेष प्राविण्या प्राप्त केले अशा महिला खेळाडूंनाचा सन्मान चिन्ह देवून त्यांचा गौरव केला. महिलानी विविध क्षेत्रात, खेळात व सामाजिक कार्यात पुढे येण्या बाबत माहिला जागतिक महिला दिननिमीत्त अहानात्मक सविस्तर मार्गदर्शन केले. श्रीमती मनिषा बिक्कड मडॅम, समुपदेशक यांनी जागतिक महिला दिना निमीत्ता महिला दैनदिन जीवन जगत असताना महिला आपले कर्तव्य व जबाबदारी निभावताना स्वतःच्या मनाला मनात निर्माण होण-या भावनांना समजून न घेतल्यामुळे त्यांच्या भावना त्याच ओळखू न शकल्यामुळे त्याचे व्यवस्थापन करता येत नाही. म्हणुन त्याचा परिणाम हार्मोनल इन्बॅलेन्स, स्कीन

▶▶ उर्वरित पान २ वर

## रक्षण करताच भक्षक झाल्याने न्याय कोणाला मागायचा ?

### पाटोदा येथील घटनेचा मनसेकडून जाहीर निषेध; आरोपीला भर चौकात चाबकाचे फटके द्या: वर्षा जगदाळे

**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा पोलीस ठाण्याचे बीट अंमलदार उद्धव गडकर यांनी जागतिक महिला दिनाच्या दिवशीच एका महिलेवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बीट अंमलदार याच्यावर बलात्काराचा गुन्हा नोंद करण्यात आला असून अशा नालायक कायद्याच्या रक्षण कर्त्याला भर चौकात नग्न करून चाबकाचे फटके देण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य महिला उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी केली आहे.



पाटोदा पोलीस ठाण्यात बीट अंमलदार पदावर कार्यरत असणारे उद्धव गडकर यांच्याकडे कामानिमित्त एक महिला पोलीस ठाण्यात येत होती या संधीचा फायदा घेत महिलेचा मोबाईल क्रमांक घेत तिला मेसेज संभाषण द्वारे जाळ्यात ओढत तिला पाटोदा येथे बोलवून घेत तिच्यावर अत्याचार करण्यात आला. पीडित महिलेच्या फिर्यादी वरून बीट अंमलदार उद्धव गडकर यांच्या विरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर

## सुरेश धस यांना सहआरोपी करा

### बीडमध्ये जनआक्रोश मोर्चा, सहा मागण्या; ढाकणे कुटुंबीय मोर्चात उतरले

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या शिरूरकासार येथील सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याच्यावर गुन्हा दाखल होऊन देखील तो अद्याप फरार आहे. ढाकणे कुटुंबाच्या मारहाणीच्या निषेधार्थ आणि खोक्याला तात्काळ अटक करा, या मागणीसाठी आज शिरूर शहर बंदची हाक देण्यात आली आहे.

तसेच येथील पोलीस ठाण्यावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चात शेकडो लोक सहभागी झाले





आहेत. या मोर्चामध्ये ओबीसी नेते लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्या सह अनेक जन सहभागी झाले आहेत. सकाळी ९ वाजता हा आक्रोश मोर्चा निघाला आहे. आरोपीला वाचवणाऱ्या भाजप आमदार सुरेश धस यांना सहआरोपी करा, अशी मागणी या मोर्चेकऱ्यांनी केली आहे. या मोर्चात एकूण सहा मागण्या करण्यात आल्या.

या मोर्चात ढाकणे कुटुंबीयही सहभागी झाले होते. यावेळी महेश ढाकणे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. सतीश भोसलेची एसआयटी चौकशी करा. आम्हाला राहायची भीती वाटते रात्रभर झोप येत नाही. माझ्या वडिलांचे दात पडलेत, माझा पाय फ्रॅक्चर झालाय. त्याने कमीत कमी २०० हरणं मारले आहेत. त्यामुळे त्याची डखढ चौकशी व्हायला पाहिजे. त्याला लवकरात लवकर अटक करा. आमच्या जीवाला पुन्हा धोका आहे, असं महेश ढाकणे म्हणाले.

आम्हाला त्याबाबत काही माहिती नाही, पण सतीश भोसले आम्हाला मरण्याच्या अवस्थेत टाकून गेला होता. ज्या लोकांनी आमच्यावर हल्ला केला. त्या सगळ्यांना लवकरात लवकर अटक व्हावी. सतीश भोसले खड्डे करून काय काय पुरलं आहे याची चौकशी व्हावी. त्यादिवशी सुद्धा तो

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये शेल एनएक्सप्लोरर्स रिफ्रेशर 1 शिक्षक प्रशिक्षण यशस्वीरित्या संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

अटल टिंकरींग लॅब (एटीएल) आणि नीति आयोगाच्या सहकार्याने शेल एनएक्सप्लोरर्स रिफ्रेशर १ हे प्रशिक्षण, जानेवारीमध्ये एनएक्सप्लोरर्स ट्रेनिंग ऑफ ट्रेनर्स (टीओटी) मध्ये सहभागी झालेल्या शिक्षकांसाठी बीडमध्ये यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले. या रिफ्रेशर सत्राचा उद्देश त्यांच्या संबंधित शाळांमध्ये एनएक्सप्लोरर्स कार्यशाळा



आयोजित करण्यात शिक्षकांच्या प्रयत्नांना ओळखणे आणि त्यांचे कौतुक करणे आणि प्रकल्प विकासाच्या पुढील चरणांवर मार्गदर्शन करणे हा होता. हे प्रशिक्षण शिक्षकांना त्यांचे अनुभव सामायिक करण्यासाठी, त्यांच्या शंका दूर करण्यासाठी आणि एनएक्सप्लोरर्स पद्धतीबद्दलची त्यांची समज मजबूत करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करते. परस्परसंवादी चर्चा (इंटरॅक्टीव डिस्कशन )आणि प्रत्यक्ष उपक्रमांद्वारे, सत्राने समस्या सोडवणे(प्रॉब्लेम सॉल्वींग), प्रणाली विचारसरणी (सिस्टीम थिंकींग) आणि शाश्वत नवोपक्रम (सस्टेनेबल इनोवेशन) या प्रमुख संकल्पनांना बळकटी दिली.

शिक्षकांनी सत्रात सक्रियपणे सहभाग घेतला, वास्तविक जगातील समस्या (रियल वर्ल्ड प्रॉब्लेम) सोडवण्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याच्या त्यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## धारूर शहर डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पदी अजय (बबलू) गायसमुद्रे यांची निवड

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर १३४ वे सार्वजनीक जयंती उत्सव समिती चे कार्यकारणी निवडीसाठी बैठक होऊन अध्यक्षपदी एकमताने युवा कार्यकर्ते अजय उर्फ बबलु गायसमुद्रे यांची एकमताने निवड करण्यात आली व मोठ्या उत्साहात विवीध कार्यक्रम घेऊन जयंती साजरी करण्याचे ठरवण्यात आले.




धारूर येथे विर पांडूरंग चौक येथे माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव सिरसट , रि प ई चे तालुकाध्यक्ष धोंडीराम सिरसट, माजी नगरसेवक चोखाराम गायसमुद्रे, रि प ई नेते



किशोर गायसमुद्रे, नगरसेवक संतोष बप्पा गायसमुद्रे शंकर गुरुजी गायसमुद्रे, बाबासाहेब गायसमुद्रे, सुनिल सिरसट, बंडुआण्णा गायसमुद्रे, सुजित वैरागै माणीक लोखंडे, जितेंद्र गायसमुद्रे आदीचे प्रमुख उपस्थीतीत व मार्गदर्शना खाली कार्यकर्त्यांची बैठक होऊन यावर्षी धारूर शहरात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात व विवीध कार्यक्रम घेऊन उत्साहात साजरी करण्याचे ठरवण्यात आले. यावेळी सार्वजनीक उत्सव समिती एकमताने निवडण्यात आली जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पदी अजय उर्फ बबलू

▶▶ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शनिवारी ता.८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिला शिक्षिका व मातांचा सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्र उभारणीत अनमोल योगदान देणाऱ्या महिलांची त्यांच्या अतुलनीय कार्याची माहिती प्रमुख मार्गदर्शक मुख्याध्यापक आबासाहेब हांगे यांनी दिली. यावेळी विविध कलागुणांची जोपासना करणा-या आदर्श विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला. *सक्षमतेचा, कल्पकतेचा, संयमाचा, कर्तव्यनिष्ठतेचा, ममतेचा... सन्मान करण्याचा आजचा दिवस असल्याने मातापालकांचाही सन्मान करून महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. महिला दिनाचे औचित्य साधून चित्रकला स्पर्धा ही आयोजित करण्यात आली होती .यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे ,ज्येष्ठ शिक्षक श्री आगाम एस. बी.श्री चौरे बी. बी. सहशिक्षिका श्रीमती कुलकर्णी माधुरी, माता पालक, सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अमर पुरी सर यांनी केले.

## आपले संस्कार व संस्कृती हेच आपले सुरक्षा कवच : प्रा.माधुरीताई मुंडे

### पिंपळगव्हाण येथे महिला दिनाच्या निमित्ताने स्त्री शक्तीचा सन्मान..

**केज । प्रतिनिधी**

आपले संस्कार व सांस्कृती हेच आपले सुरक्षा कवच असते.योग्य संस्कार व सांस्कृतिचा अवलंब करूण समाजात वावरणाऱ्या महिला आज उच्च पदावरती कार्यरत आहेत.त्यांचा आदर्श घेऊन आपणही आपले संस्कार व सांस्कृती जपत आपले ध्येय मिळवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन प्रा.माधुरीताई मुंडे केले आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ग्राम पंचायत पिंपळगव्हाण व जि.प.प्रा. शाळा पिंपळगव्हाण ता.केज यांच्या संयुक्त विद्यमानाने महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित स्त्रि शक्तिचा सन्मान ग्रामस्तरीय महिला सन्मान मेळाव्याचे शनिवारी आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचा शुभारंभ प्रा.माधुरीताई मुंडे यांच्या



शुभहस्ते तर जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा श्रीमती राधाताई सपकाळ,प्रा.कांबळे मॅडम, ॲड मुंडे मॅडम, दरबारे मॅडम, ग्रामविकास अधिकारी एस.बी.केदार मॅडम यांच्या प्रमुख उपस्थिती करण्यात आला. शैक्षणिक, राजकीय, आरोग्य अशा विविध क्षेत्रात महिलांचे योगदान हे प्रशंसनीय आहे.अशा कर्तृत्ववान महिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवण्याचे आवाहन केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गावातील महिला पदाधिकारी, अंगणवाडी ताई,आशा वर्कर,बचत गटातील महिला,महिला लाभार्थी,शाळेतील शिक्षिका, महिला शेतकरी व उपस्थित माता भगीनींचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी सरपंच सचिन गायकवाड, उपसरपंच शेलाजी घोळवे,ग्रा.पं.सदस्य,ग्रा.पं.महिला सदस्या,जि.प.उ.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक श्री मुंडे सर,शाळेचे शिक्षक वृंद गावातील सन्माननीय महिला माता भगिनीं नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारिका डोंगरे यांना राज्यस्तरीय कर्तुत्ववान महिला पुरस्कार प्रदान

**धारूर । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्ताने ठाणे येथील मातृसेवा फाउंडेशन, यशोमंगल एज्युकेशन कन्सल्टन्सी हिंगणघाट वर्धा, श्री. विलास भटकर, मुंबई आणि शिक्षक ध्येय महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय कर्तुत्ववान महिला पुरस्कार २०२५ सोहळ्यामध्ये थेटेगव्हाण शाळेतील शिक्षिका श्रीमती सारिका डोंगरे यांना राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. या स्पर्धेत राज्यभरातील महिला सहभागी होत्या. महिलांनी राबवलेल्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती नागरिकांना व्हावी व त्यांच्या कार्याला प्रेरणा मिळावी. सुरू केलेल्या कार्यास प्रोत्साहन मिळून त्यांच्यातील कर्तुत्व वृद्धिंगत व्हावे. या हेतूने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कारामध्ये आदिवासी विकास विभाग अंतर्गत औरंगाबाद प्रकल्पातील थेटेगव्हाण माध्यमिक आश्रम शाळा येथील प्राथमिक शिक्षिका श्रीमती सारिका



सुभाष डोंगरे यांच्या कला-कार्यानुभवातून जीवन शिक्षण या नाविन्यपूर्ण उपक्रमास विचारात घेऊन राज्यस्तरीय कर्तुत्वान महिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रीमती सारिका सुभाष डोंगरे या मागील पंधरा वर्षापासून आदिवासी विभागामध्ये प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. कला कार्यानुभवातून शाळेतील मुलींमध्ये शालेय शिक्षणाबरोबरच कला विकसित व्हाव्यात या दृष्टिकोनातून मातीकाम, लोकर विणकाम, रांगोळी, चित्रकला आणि बुलेटिन बोर्ड यांसारख्या विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांना

▶▶ उर्वरित पान २ वर